दिवाणी दावा क्र. ३००/२०२१
अमृत वि. विष्णू व इतर
निशाणी क्र.३४ वर



**<u>उलटतपास प्रतिवादीतर्फे वकील श्री.एस.बी.चाटे यांच्यामार्फत सुरु:-</u>**

**१०.** मी एकनाथ दहिफळे, गोविंद दहिफळे व जनार्धन दहिफळे यांना ओळखतो. आमचे कुंटूंबाची एकत्रीत ९ एकर जमीन आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी व आमचेमध्ये दावा मिळकत शेतामध्ये जाण्यावरुन वाद आहेत. हे म्हणणे खरे नाही की, या रस्त्याच्या वादावरुन या न्यायालायात फौजदारी केस प्रलंबित आहे. या फौजदारी प्रकरणात रस्त्याबाबत वाद असल्याचे मी नमूद केले आहे, हे मला आठवत नाही. मला कोणत्या जमिनीचा कोणता गट क्रमांक आहे, हे माहिती नाही, त्यामुळे मला चतु:सीमा प्रत्येक गटाच्या सांगता येत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, एकनाथ दहिफळे, गोविंद दहिफळे व जनार्धन दहिफळे या व्यक्तींनी पंच म्हणून आमचे भावा-बहिणींमध्ये जमिनीचे वाटप करुन दिले होते. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, पंचानी या जमिनी तुम्ही करुन खा असे सांगितले होते.

**११.** हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०४/१ व १०४/३ या जमिनी या दाव्यात समाविष्ट केलेल्या नाहीत. आमचे एकत्र कुंटूंबाचे जमिनींचे आजपावेतो वाटप झालेले नाही, फक्त कोणत्या जमिनी कोणी कसायच्या व उत्पन्न घ्यायचे ठरले होते. सदरचा दावा मी जमीन माझ्या नावावर करुन द्यावी म्हणून दाखल केलेला आहे. गट क्र.१०४/१ व १०४/३ या जमिनी कोणाच्या नावावर आहेत, हे मला सांगता येणार नाही. मी सन २०१८ साली अंधोरी येथील जमिनी खरेदी केल्या, त्यांचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१०४/१ व १०४/३ मधील जमिनी वादी व प्रतिवादी यांचे एकत्र कुंटूंबाचे उत्पन्नातून माझी सून काशीबाई हिचे नावे विकत घेतल्या होत्या. गट क्र.१०४/१ व १०४/३ मधील माझे सुनेने तिचे आईकडून रक्कम घेवून विकत घेतली होती. माझी सून काशीबाई हिची आई शेती व्यवसाय करते, तिला किती शेती आहे, हे मला माहिती नाही. सन २०१८ साली माझे सुनेच्या आईने जमीन विक्री केली व तिला रक्कम मिळाली याबाबत माहिती नाही. माझे सुनेच्या आईने जमीन विकत घेण्यासाठी रक्कम दिली, याबाबत तिचा पुरावा देवू शकतो. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.१०४/१ व १०४/३ या जमिनींमध्ये प्रतिवादींना हिस्सा देणे लागू नये म्हणून त्या जमिनी या दाव्यात समाविष्ट केल्या नाहीत. सुनेच्या नावावर घेतलेली जमीन वसंतराव जवणे यांचेकडून विकत घेतली होती. मी त्यांची साक्ष नोंदवू शकतो.

**१२.** माझे शपथपत्रातील व दाव्यातील संपुर्ण मजकुर मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही

की, रस्त्याच्या वादावरुन मी बहिणीला सोबत घेवून प्रतिवादीविरुध्द खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे शपथपत्रातील मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

स्वाक्षरीत/-
**( आर.डी. वाबळे )**
सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर,
अहमदपूर.

स्थळ - अहमदपूर.
दिनांक- २६/०९/२०२५